पुण्यश्लोक 300

# महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित


महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

महाराष्ट्र शासन उपक्रम (CIN : U40100MH2005SGC153648)

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, धारावी रोड, माटुंगा, मुंबई - ४०० ०१९.

दुरध्वनी ०२२-६९४२५००० website: www.mahagenco.in Email ID- apoclaims@mahagenco.in.


क्र.महानिर्मिती/CPF Loan/मासं-देयके/का.टि.क्र.८१२/ 09155 दिनांक: 12 OCT 2026

## परिपत्रक

प्रति,
मुख्य कार्यालय/सर्व क्षेत्रिय कार्यालय,
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित.

**विषय:** कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजना २०२६ अंतर्गत भविष्य निर्वाह निधीतील आगाऊ रक्कम/अंशत: रक्कम काढण्याबाबतच्या सुधारित कार्यपद्धतीची अंमलबजावणीबाबत.

**संदर्भ:** १) Secretary MSEB CPF Trust Circular No.AD/PF/INV/४२७/२४८ dtd.१८.०८.२०२६
२) Secretary MSEB CPF Trust Addendum to Circular No.AD/PF/INV/२३६ dtd.२५.०८.२०२६

---

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येत आहे की, Secretary MSEB CPF Trust यांचे संदर्भिय क्र. १ व २ चे परिपत्रक मासं-देयके विभागास प्राप्त झाले होते.

संदर्भिय क्र.१ च्या परिपत्रकात भविष्य निर्वाह निधी परतावा कर्ज उचल केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या मासिक वेतनातून दि.१८.०८.२०२६ पासून तसेच, संदर्भिय क्र.२ च्या परिपत्रकात सदर परतावा कर्ज दि.१०.१०.२०२६ पासून बंद करण्याचे निर्देश पारीत केलेले होते.

त्याअनुषंगाने, सदर बाबतीत सक्षम अधिकारी यांच्या मंजूरीस्तव प्रस्ताव सादर केला असता त्यांनी खालीलप्रमाणे मंजूरी प्रदान केलेली आहे.

१. सांघिक कार्यालय/क्षेत्रीय कार्यालयातील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्यापैकी ज्यांनी भविष्य निर्वाह निधी परतावा कर्ज उचल केलेली आहे त्यांची माहे ऑक्टोबर २०२६ पासून भविष्य निर्वाह निधी परतावा कर्ज वसूली आप-आपल्या स्तरावरुन थांबविण्यात यावी.

२. सदर अधिकारी/कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधी परतावा कर्जावरील व्याज आणि BOT रक्कमेच्या वसूलीबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येईल.

३. ज्या अधिकारी/कर्मचारी यांचे मासिक वेतन थांबविण्यात आले आहे अशा कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी परतावा कर्ज वसूलीबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येईल.

४. भविष्य निर्वाह निधी परतावा कर्जाची वसूली SAP प्रणालीमध्ये थांबविण्या/बंद करण्याकरीता RTR Core Team ने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे. तसेच, त्याव्यतिरिक्त येणाऱ्या त्रुटी/समस्या संबंधित RTR Core Team सोबत संपर्क साधावा.

सदर परिपत्रक https://esevarth.mahagenco.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(धनाजी तोरस्कर)
कार्यकारी संचालक (मासं)